**प्रेस नोट**

पोलीस अधीक्षक, कार्यालय जळगाव
दिनांक - २६/०७/२०२५

प्रती,
मा. संपादक,
---------- वृत्तपत्र

**विषय-** गाव जानवे ता. अमळनेर येथे मिळुन आलेल्या अज्ञात महीला मृतदेहा बाबत तपासा अंती खुन झाल्याचे निष्पन्न झाले बाबत.....

दिनांक २३/०७/२०२५ रोजी माहीती मिळाली की, जानवे जंगल परीसरात मानवी अवयेश विखुरलेल्या अवस्थेत पडलेले आहेत त्यावरुन अमळनेर पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम व स्टॉफने जानवे जंगल परीसरात जावुन खात्री केली असता एका अज्ञात महीलेच्या मानवी अवषेश पडलेले दिसुन आले सदर महिलेचा मृत्यु कशामुळे आला असावा तसेच सदर महीलेची ओळख पटवणे हे पोलीसांना जिकरीचे होत त्यामुळे मा. पोलीस अधीक्षक, जळगाव महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक चाळीसगाव, श्रीमती कविता नेरकर यांनी सदर प्रकरणी सखोल चौकशी करणे कामी अमळनेर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले होते. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विनायक कोते यांनी घटनास्थळी भेट देवुन प्रथम अमळनेर पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यु क्र.५९/२०२५ बीएनएसएस कलम १९३ प्रमाणे दाखल करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

सदर अकस्मात मृत्युच्या चौकशीत घटनास्थळी मिळुन आलेल्या वस्तु तसेच आधार कार्डवरुन माहीती घेतली असता, सुरत गुजरात मधील चौकबाजार पोलीस स्टेशन येथे दिनांक १७/०५/२०२५ रोजी वैजंतीबेन भगवान भोई हिची मिसींग दाखल करण्यात आलेली होती. परंतु सदर महीला ही दिनांक ०४/०५/२०२५ रोजी तीचे राहते घरी २१.०० वा.चा सुमारास घरातुन निघुन गेलेली होती. चौक बाजार पोलीस स्टेशन सुरत मिसींग क्र. ५८/२०२५ मधील तक्रारदार गणेश भगवान भोई यांचेसोबत संपर्क साधुन त्यांना घटनास्थळावर मिळुन आलेल्या वस्तु तसेच आधार कार्डबाबत सांगितले असता सदरच्या वस्तु आणि आधार कार्ड हे माझी आई वैजंतीबेन भगवान भोई हिचेच असल्याचे, सांगुन सदरचा मृतदे हा त्यांचा आईचाच असल्या बाबत माहीती दिली.

सदर तपासा दरम्यान तांत्रिक विश्लेषनावरुन सदर महीलेशी दिनांक ०२/०५/२०२५ ते ०५/०५/२०२५ पर्यंत संशयित आरोपी नामे अनिल गोविंदा संदानशिव हा सतत संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले. अनिल संदानशिव याची सविस्तर माहीती घेतली असता त्याने पारोळा पोलीस स्टेशन हद्दीत महीलेचा खुन केल्याने पारोळा पोलीस स्टेशन सीसीटीएनएस गुरनं १५४/२०२५ बीएनएस कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यात देखील अनिल संदानशिव यानेच केला असल्याने सध्या सदर गुन्ह्यात आरोपी हा मॅजिस्ट्रेट कस्टडीत आहे. तसेच अमळनेर पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या गुरनं २६१/२०२५ बीएनएस कलम १०९ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात देखील महीला शहीनाज बी हीला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्या असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यात देखील अनिल संदानशिव यानेच केला असल्याने सध्या सदर गुन्ह्यात आरोपी हा मॅजिस्ट्रेट कस्टडीत आहे.

सदर दोन्ही गुन्ह्याचे घटनास्थळ हे अकस्मात मृत्युच्या घटनास्थळाचा ८०० ते ९०० मीटर दरम्यान असल्याने मिळतेजुळते असल्याने तसेच तांत्रिक विश्लेषणावरुन मयत वैजंतीबेन भगवान भोई हिचा खुन हा अनिल संदानशिव यानेच केलेला असल्याबाबत खात्री झाल्याने पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अमळनेर पोलीस स्टेशन गुरनं ३०४/२०२५ बीएनएस कलम १०३(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्ह्याचा तपास पोनि दत्तात्रय निकम हे करीत आहे. दाखल गुन्ह्याचे तपासादरम्यान आरोपी अनिल संदानशिव याचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने विचारपुस करता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. यातील संशयीत अनिल संदानशिव याचा मागील अभिलेख पडताळला असता पारोळा पोलीस स्टेशन येथील खुनाचा गुन्हा व अमळनेर येथील खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा असे दोन गुन्हे दाखल आहेत. आरोपीला दिनांक ३०/०७/२०२५ पावतो पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आलेली आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्री.महेश्वर रेड्डी सर, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती कविता नेरकर मॅडम, अपर पोलीस अधिक्षक श्री. अशोक नखाते सर, उपविभागीय पोलीस अधिकारी, अमळनेर श्री. विनायक कोते यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोउपनि समाधान गायकवाड पोउपनि नामदेव बोरकर, पोउपनि शरद बागल नेम.स्थागुशा, पोहेकॉ/कैलास शिंदे, पोहेकॉ/काशिनाथ पाटील व पोकॉ/ सागर साळुंखे यांनी केली आहे.